दक्षतारोध...

ओलांडण्यास मंजुरी देण्याबाबतची प्रकरणे त्वरीत निकाली काढणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९३/एम-११/९३/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ७ एप्रिल, १९९३.

संदर्भ :- [१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६०/डी, दिनांक ७ जून, १९६०.
[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६३/डी, दिनांक १७ ऑगस्ट, १९६३.
[३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक २८ ऑक्टोबर, १९७६.
[४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८८/२२२३/प्र.क्र.४/८९/बारा, दिनांक १६ मार्च, १९८९.
[५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८९/९७१/प्र.क्र.१६/८९/बारा, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९.
[६] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८९/९७१/प्र.क्र.१६/८९/बारा, दिनांक २८ फेब्रुवारी, १९९०.

प रि प त्र क

शासन सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांच्या दक्षतारोध पार करण्याच्या प्रकरणी अनुज्ञा देण्याबाबतचे अधिकार वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकांव्दारे यापूर्वीच विस्तृत प्रमाणात विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे अशा प्रकरणी विलंब टाळण्याच्या दृष्टीने अंमलात आणण्याची कार्यपध्दत देखील संदर्भीत आदेशांनुसार विहित करण्यात आलेली आहे. तसेच दक्षतारोध पार करण्यास अनुमती देण्याबाबतची प्रकरणे प्रत्येक वर्षी नवीन वर्षाचे गोपनीय अभिलेख उपलब्ध झाल्यानंतर तात्काळ म्हणजेच जुलै महिन्यामध्ये विचारात घ्यावीत, असेही आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामुळे दक्षतारोध पार करण्याच्या प्रकरणात अंतिम निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत विलंब होऊ नये, असे शासनाचे धोरण आहे.

दक्षतारोध पार करण्यास अनुज्ञा देण्यास सक्षम असणा-या प्राधिका-यांनी, दक्षतारोध पार करण्यास देय झालेल्या शासन सेवकांची प्रकरणे निर्णय घेण्यासाठी वेळीच परिपूर्णरित्या उपलब्ध रहातील, अशी काळजी घ्यावयाची आहे. एखादा अधिकारी दक्षतारोध पार करण्यास मंजुरी देण्याच्या नियत तारखेस [ Due date ] पात्र आढळून न आल्यास त्याचे प्रकरण त्या पुढील प्रत्येक वर्षी म्हणजेच जुलै महिन्यामध्ये विचारात घेवून त्याची योग्यायोग्यता तपासावयाची आहे. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, याबाबतीत स्वयंस्पष्ट आदेश असून देखील संबंधित कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या प्रकरणी कार्यवाही करण्यास बराच विलंब होतो व परिणामत: शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना त्रास सहन करावा लागतो. तो टाळण्यासाठी सदर आदेश सर्व नियुक्ती प्राधिका-यांच्या निदर्शनास पुन्हा एकदा आणण्यात येत आहेत. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या अखत्यारामधील

[कृ.मा.प.]

शासकीय कर्मचारी/अधिकारी यांची दक्षतारोध पार करू देण्याबाबतची प्रकरणे वरील संदर्भाकित आदेशानुसार त्वरीत निकाली काढण्याबाबत दक्षता घ्यावी. दक्षतारोध पार करू देण्यास अनुमती नाकारल्यास संबंधितांना तसे कळविण्यात यावे.

दक्षतारोध पार करू देण्याबाबतची प्रकरणे वेळीच तपासण्यात आली नाहीत तर दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अभिलेखात त्याबाबतची प्रतिकूल नोंद घेण्यात यावी, हे देखील स्पष्ट करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्य मंत्री यांचे सचिव,
३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई [पत्राने],
४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],
५. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई [पत्राने],
६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई [पत्राने],
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,
११. मंत्रालयातील सर्व विभाग,
१२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.